## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २१ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विभागीय उपहारगृहाच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध विकासकामांचे उद्घाटन बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ परिसरातील बसस्टॉपजवळ असलेल्या विभागीय उपहारगृहाजवळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

विद्यापीठात विविध कामांसाठी येणारे विद्यार्थी आणि पालक यांना ऊन व पावसापासून संरक्षण मिळावे, यासाठी शेडची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना पथनाट्य, सांस्कृतिक उपक्रम आणि इतर छोटे कार्यक्रम आयोजित करता यावेत, यासाठी ओपन ॲम्फीथिएटर तयार करण्यात आले आहे. विभागीय उपहारगृहाच्या दुसऱ्या टप्प्यातील विकासकामांतर्गत विद्यार्थ्यांना चहा, नाश्ता व अल्पोपाहारासाठी अधिक जागा आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यापीठ परिसरात येणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालकांनाही या सुविधांचा लाभ घेता येणार असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना यामुळे अधिक चांगली जागा उपलब्ध होणार आहे.

या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्राचार्य एस. एस. राजपूत, प्राचार्य जगदीश पाटील, प्राचार्य शिवाजी पाटील, प्राचार्य महेंद्रसिंग रघुवंशी, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे, ॲड. अमोल पाटील, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. सुरेखा पालवे, डॉ. उज्ज्वल पाटील, अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, प्रभारी कार्यकारी अभियंता राजेश पाटील आणि उपअभियंता ए. एन. गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने या कामांमुळे विद्यार्थ्यांना अधिक सोयीस्कर वातावरण उपलब्ध होणार असून, उपहारगृह परिसराचा उपयोग केवळ अल्पोपाहारापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांसाठीही करता येणार आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. २१ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पदवी प्रवेशपूर्व परीक्षा (PET) २०२६ चे आयोजन २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी एकूण ३ हजार ३४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, ४० विषयांसाठी ही परीक्षा घेतली जाणार आहे.

विद्यापीठात पीएच.डी. प्रवेशासाठी युजीसीच्या नियमानुसार प्रवेशपूर्व परीक्षा आयोजित केली जाते. त्यानुसार पेट २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षा केंद्रात घेण्यात येणार आहे.

पेट परीक्षेची प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनमध्ये दि. १५ ऑक्टोबर पासून उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या परीक्षेची तारीख व वेळ तपासून निर्धारित वेळेत परीक्षेस उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले आहे; मात्र त्यांचा अर्ज दाखल झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी भरलेल्या शुल्काचा परतावा मिळविण्यासाठी विद्यापीठाकडे आवश्यक अर्ज सादर करावा, असे आवाहनही विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

**बातमी क्र. ३**

जळगाव, दि. २१ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केसीआयआयएल (KCIIL) च्या इन्क्युबेटेड स्टार्टअप्सनी राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज २०२६ मध्ये घवघवीत यश मिळवले. या स्पर्धेत ४७ स्टार्टअप्समधून केसीआयआयएलच्या स्टार्टअप्सनी तिन्ही सर्वोच्च पारितोषिके पटकावली.

टेक्नोस्युटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक नीलेशकुमार पंडित यांनी प्रथम, गीगो इनोव्हेशन्सचे संस्थापक संगमेश्वर गुरूशेठे आणि सागर शिंदे यांनी द्वितीय, तर एमआरबी इनोव्हेशनचे संस्थापक मनोज रमेश भालेराव यांनी तृतीय क्रमांक मिळवला. टिनिटसच्या निदान व उपचारासाठी तंत्रज्ञानाधारित उपाय, एसटी प्रवाशांसाठी 'लालपरी स्मार्ट ॲप' आणि क्रिकेट सरावासाठी 'क्रिकबोट स्मार्ट बॉलिंग मशीन' या त्यांच्या नवकल्पनांना गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, जळगावच्या खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, भाजपचे जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी यांच्यासह विविध शासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या यशाबद्दल केसीआयआयएलतर्फे तिन्ही विजेत्या स्टार्टअप्स आणि त्यांच्या संस्थापकांचे अभिनंदन करण्यात आले. या यशामुळे उत्तर महाराष्ट्रातील नवउद्योजकांना प्रोत्साहन मिळणार आहे.

....................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६                                        दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**